# खादी फक्त कापड नसून एक विचार आहे



## -:- नागरीकांची व माहीती पुस्तीका सनद -:-

Email - dvioyavat@rediffmail.com- दुध्वनी क्र.07232-244791

# महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, यवतमाळ.

## -:- प्रस्तावना -:-

महाराष्ट्रतील खादी व ग्रामोद्योगच्या विकास कार्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची 1962 मध्ये राज्य विधान मंडळाच्या कायदयानुसार स्थापना केली आहे. ग्रामीण क्षेत्रतील गरजू लोकांना रोजगार खेड्र्यापाड्यातील कारागीर व बलुतेदार यांच्या उद्योगाचे स्थैर्य स्वयं रोजगाराच्या क्षेत्राची व्यापक प्रमाणात वृध्दी, खादी व ग्रामोद्योगासाठी स्थानीक बँकांच्या माध्यमातून पतपूरवठा निवडक ग्रामोद्योगाची प्रशिक्षण, स्थानीक साधन संपत्तीचा वापर करून ग्रामीण भागीतील कारागीरांना रोजगार मिळवून देणे हे मंडळाचे उद्दीष्ट आहे. वरील उद्दीष्ट पूर्तीचे दृष्टीने प्रत्येक जिल्हयात जिल्हा स्तरावर जिल्हा कार्यालय आहे. तर तालूकास्तरावर तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघाची कार्यालये आहेत. यवतमाळ जिल्हयात उद्योगभवन तिसरा माळा दारव्हारोड यवतमाळ येथे मंडळाचे जिल्हा कार्यालय असून आर्णी व झरीजामणी हे नविन तालुके वगळून प्रत्येक तालुक्याचे ठीकाणी तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघाचे कार्यालय आहेत. या कार्यालयाची माहिती सोबत सादर केली आहे.

## -:- मंडळाची स्थापना -:-

महाराष्ट्रात खादी व ग्रामोद्योगांना प्रात्साहन देवून त्यांचे संघटंन विकास व विनिमय करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम 1960 (सन 1960 चा मुबई अधिनियम क्र. 19 नूसार (करण्यात आली आहे)

## -:- उद्देश -:-

ग्रामीण भागातील गरजू लोकांना रोजगार पूरवीणे, कारागीर, उद्योजक बलुतेदार यांच्या उद्योगांचे स्थैर्य, स्वयंरोगारांच्या क्षेत्राची व्यापक प्रमाणात वृध्दी , कारागीरांना कच्चामाल पूरवठा, कारागीरांचे तांत्रीक कौशल्य वाढवीणे, यासाठी निवडक ग्रामोद्योगांचे प्रशिक्षण, खादी ग्रामोद्योगांचे विकासक पोषक असे धोरण ठरविण्याबाबत शासनाशी प्रभावी संपर्क स्थापन करणे व स्थानीक साधन संपत्तीचा वापर करून ग्रामीण भागातील उद्योजक, सुशिक्षित बेरोजगारांना, कारागीर यांना स्थानीक ठिकाणी रोजगार उपलब्ध करून देणे हा मंडळाचा उद्देश आहे.

## -:- मंडळाची रचना -:-

मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिकनियम 1960 च्या (सन 1960 चा मुंबई अधिनियम क्रमांक 19 )कलम 4 (1) व (2) मधील तरतुदीनूसार शासनाकडून मंडळावार अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यात येते. महाराष्ट्र शासनाने ज्या व्याक्ती खादी ग्रामोद्योगांशी निगडीत आहेत व ज्यांना खादी व ग्रामोद्योगांच्या कामाचा अनुभव आहे अश्या अशासकिय किमान 5 व कमाल 7 सदस्यांची नियुक्ती मंडळावर करण्यात येते. मंडळाचे सदस्य सचिव म्हणून मुख्ृय कार्यकारी अधिकारी हे काम पाहतात. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी मंडळाचे मुख्ृय कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती शासनाकडून केली जाते.

( 1 ) पुढील पानावर



**-:- मंडळामार्फत राबविल्या जाणा-या विविध शासन पुरस्कृत योजनेची संक्षिप्त् माहिती -:-**

मंडळाचे माध्यमातून पुढील प्रमोणे शासन पुरस्कृत योजना राबविल्या जातात.

1) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP)
2) कारागीर रोजगार हमी योजना (A.E.G. Scheme)
3) उद्योजक कारागीर मदत योजना (विशेष घटक योजना)
4) मधमाश्यापालन उद्योग

वरील योजनेची संक्षिप्त् माहिती खालील प्रमाणे योजना निहाय्य् सादर करण्यात येत आहे.

1) **पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम :-** भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या 61 व्या वर्धापन दिनी पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना , केंद्र शासन पुरस्कृत खादी ग्रामोद्योग आयोग, महाराष्ट्र राज्य् खादी व ग्रामोद्योग मंडळ व जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्याचे धोरण जाहीर केले. सन 2008 -09 या वित्तीय वर्षा पासून ही योजना राबविली गेली आहे. खादी व ग्रामोद्योग आयोग व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ हे ग्रामीण भागासाठी तर जिल्हा उद्योग केंद्र ग्रामीण व शहरी भागासाठी कार्य करते.

**-:- पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमा अंतर्गत खालील प्रमाणे अंमलबजावणी केली जाते.-:-**

**1) अर्थ सहाय्य् प्रकल्प् मर्यादा :-**

1) व्यवसाय व सेवा उद्योग रक्कम रू. 10,00,000/-
2) उत्पादन क्षेत्रातील उद्योग उभारणीसाठी रू. 25,00,000/-

**2) अर्थ सहाय्याचे स्वरूप :-**

| अ.क्र | लाभार्थीची वर्गवारी | स्वगुंतवणूक प्रकल्प किंमतीच्या | अनुदानाचा भाग ( प्रकल्पाच्या किंमतीच्या) | |
|---|---|---|---|---|
| | | | शहरी | ग्रामीण |
| अ | सामान्य् प्रवर्ग | 10 टक्के | 15 टक्के | 25 टक्के |
| ब | राखीव संवर्ग :- अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, अल्पसंख्यांक,इतर मागासवर्गीय, महिला, माजी सैनिक, अपंग. | 5 टक्के | 25 टक्के | 35 टक्के |

अ. योजनेची पात्र लाभार्थी :-

1. व्याक्ती ( ग्रामीण कारागीर / उद्योजक ) स्वंयसहाय्यता बचत - गट.
2. 1860 च्या सोसायटी नोंदणी कायद्यांन्वये रजिस्टर्ड झालेल्या संस्था.
3. 1960 च्या सहकार कायद्यांन्वये नोंदणी झालेल्या सोसायट्या

**ब. शैक्षणीक पात्रता :-** उत्पादन करणा-या उद्योगाकरीता प्रकल्प् किंम्मत रू. 10 लाखाच्या वर आणि सेवा उद्योगाकरीता रू. 5 लाखाच्या वर प्रकल्प् किंमत असेल तर अर्जदाराचे शिक्षण 8 वी पर्यंत असावे.

**क. जिल्हा स्तरीय गठीत समिती :-** मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय कार्यबल समिती (D.T.F.C) गठीत केलेली असते. ह्या समितीकडून उमेदवारांची निवड करून कर्ज मागणीचे प्रस्ताव स्थानीक राष्टीयकृत बँकेकडे संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणेकडून पाठविले जातात.

**ड. योजने अंतर्गत अनुज्ञेय अनुदान देण्याची पद्धती :-** ग्रामीण भागातील उमेदवार असल्यास बँकेने कर्ज मंजुर केल्यानंतर व कर्जचा पहिला हप्ता वाटप केल्यावर (त्यात 25 ते 35 टक्के एवढे अनुदान मंजुर कर्जाच्या) संबंधीत फायनांसींग बँक राज्यस्तरावरील त्यांच्या बँकेसाठी निर्धारीत केलेल्या नोडल बँक शाखेत विहीत नमुन्यातील मार्जिनमनी क्लेम फॉर्मची माहिती व निर्धारीत कागदपत्रासह प्रस्ताव दाखल करते. व नोडल बँकेकडून अनुज्ञेय मार्जिन मनीची रक्कम फायनांसींग बँक शाखेकडे वर्ग करते. शहरी भागातील उमेदवार असल्यास याच पद्रधतीत अनुज्ञेय मार्जिनमनीची रक्कम 15 ते 25 टक्के प्रमाणे मागणी करून नोडल बँकेकडून वर्ग करते.

**-:- नकारात्म्क उद्योग सुची -:-**

या योजनेचे खालील उद्योगास नकारात्म्क सुचीत ठेवले असून अश्या उद्योगांना या योजनेतून फायदा दिला जात नाही. 1. मधमाशी संबंधीत उद्योग 2. मास मच्छी 3. पशुपालन , वराहपालन 4. शेतीलागवड 5. वहान व्यवसाय (रिक्षा , टेम्पो इत्यादी ) 6. कुकुटपालन 7. पान, तंबाखु, गुटखा या सारखे उत्पादन अथवा व्यवसाय , पर्यावरणाशी घातक असलेले कोणतेही उद्योग अथवा व्यवसाय.

**2) कारागीर रोजगार हमी योजना :-** ग्रामीण भागातील विखुरलेल्या कारागीरांना संघटीत करून गटस्थरावर शासनाचे सहकार्याने 1960 च्या सहकार कायद्यांन्वये विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघाची स्थापना केली आहे. ही योजना सन 1972 पासून सुरू झालेली असून या योजने अंतर्गत कारागीर सभासदांना कर्ज पूरवठा हा तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघाच्या माध्यामतून व यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक सहयोगाने नाबार्ड पुनर्वित्त् योजने अंतर्गत दिला जातो. यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघाचे माध्यमातून संस्थेवर नोंदविले गेलेले कारागीर सभासद यांना त्यांचे कुटीर उद्योगासाठी रू. 30,000/- हजाराचे आर्थिक मर्यादेत कर्ज मंजुर करून वाटप करते. ह्यात बारा बलुतेदार संवर्गातील कारागीर व मंडळाच्या कक्षेतील ग्रामोद्योगासाठी कर्ज देते.

**उद्योजक कारागीर मदत योजना - ( विशेष घटक योजना )**

शासनाच्या 20 कलमी कार्यक्रमाअंतर्गत कलम 11 अ अन्वये अनुसुचित जाती व नवबोद्ध समाज घटकातील दारीद्र रेषे अंतर्गत येणा-या घटकांना उद्योजक कारागीर मदत योजना अंतर्गत स्थानीक राष्ट्रीयकृत बँकेच्या आर्थिक सहयोगाने रू. 50 हजार कमालतम मर्यादेत वित्त् सहाय मंजुरीची शिफारस करून प्रस्ताव पाठविण्यात येतात. या योजने अंतर्गत मंडळाकडून बँकेने कर्ज मंजुर करून वाटप केल्या नंतर विशेष कंद्रीय सहाय्यातून रक्कम रू. 10 हजार पर्यंत अथवा मंजुर कर्जाच्या 50 टक्के पैकी कमी असणारी रक्कम लाभ धारकास अनुदान स्वरूपात मंजुर करण्यात येते. या योजनेसाठी खालील प्रमाणे पात्र घटक आवश्यक आहेत.

**पात्र घटक :-**

1) उमेदवार अनुसुचित जाती व नवबोद्ध समाज घटकातील असावा व या बाबत उमेदवाराच्या स्व्त:च्या नावाचे सक्षम प्राधिकारी यांचे कडून दिले गेलेले जातीचे प्रमाणपत्र असावे
2) उमेदवार दारीद्र रेषेखालील कुटुंबातील असावा व त्याबाबत दारीद्र रेषेचे प्रमाणपत्र व द्रारिद्र रेषेचे अलिकडील अहवालात त्यांचे नांव असावे.
3) दारीद्ररेषेखालील उमेदवाराचे वार्षीक उत्पन्न् ग्रामीण भागातील उमेदवार असल्यास रू. 40,500/- व शहरी भागातील असल्यास रू. 51,500/- एवढे वार्षीक उत्पन्न् असल्याबाबतचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करावे लागेल.

4) जात प्रवर्गानूसार त्या महामंडळाकडून शासकिय अनुदानाचा यापूर्वी फायदा घेतला नसल्याचे प्रमाणपत्र संबंधीत मंडळाकडून घेवून कर्ज मागणी प्रस्तावासोबत सादर करावे लागेल.

5) वैयक्तीक कर्ज मागणी प्रस्ताव असल्यास वय 18 ते 45 या वयोगटातील असावा.

वरील 1 ते 5 पात्रतेचे निकष् पूर्ण करणा-या उमेदवारास रू. 50 हजार पर्यंत कर्ज मागणीचा प्रस्ताव सादर केल्यास व प्रस्तावासोबत आवश्यक असलेली ईतर कागदपत्रे सादर केल्यास या योजनेचा माध्यमातून संबंधीत उमेदवारांना योजनेचे फायदे देण्यात येतात.

3) **मधमाशा पालन योजना :-** मधमाशा पालन हा उद्योग शेतीपूरक उद्योग आहे. मधमाशापालन उद्योग शेतक-यांने त्यांचे शेतावर सुरु केल्यास फुलवर्गीय असलेली पिके यात फळझाडे, फळभाज्या, भाज्यांची बियाने, डाळी वर्गीय पिके, तेल बिया पिके तृणधन्य्, फुलझाडे व शेतीतील इतर पिके, आणि जंगली वनस्पती ही सर्व पिके मधमाशा पालनासाठी उपयुक्त पिके आहेत. शेतक-यांने त्यांचे शेतावर मधमाशा पालन उद्योग सुरू केल्यास परागीभवनाव्दारे शेतीपिके, फळबागायती, पिकाच्या उत्पादनात भरीव वाढ होणेस सहायभुत होते. शिवाय मधाचेसाठी रू. 160/- किलो हमी भाव मध मंडळामार्फत खरेदी केले जातात.

मधमाशा पालन हा उद्योग शेती उद्योगाशी पुरक उद्योग असल्यामुळे व शेती उत्पादनात हा उद्योग केल्यास शेतीत भरीव स्वरूपात उत्पादनात वाढ होते.

**-:- ग्रामोद्योग वसाहत -:-**

महाराष्ट्रातील खादी व ग्रामोद्योगाच्या विकास कार्यासाठी महाराष्ट्र राज्य् खादी व ग्रामोद्योग मंडळाची 1962 मध्ये राज्य् विधान मंडळाच्य कायद्यानूसार स्थापना करण्यात आली आहे. ग्रामीण क्षेत्रातील गरजू लोकांना रोजगार , खेडया पाडयातील कारागीर व बलुतेदार यांच्या उद्योगाचे स्थैर्य, स्वयंरोजगाराच्या क्षेत्राची व्यापक प्रमाणात वृद्धी, निवडक ग्रामोद्योगाचे प्रशिक्षण, स्थानीक साधन संपत्तीचा वापर करून ग्रामीण भागातील कारागीरांना रोजगार मिळवून देणे हे मंडळाचे उद्दीष्ट आहे. या उद्रदीष्टापुर्तीच्या दृष्टीने मंडळाचे माध्यमातून 1) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम. 2) विशेष घटक योजना 3) मधमाश्यापालन योजना या शासन पुरस्कृत योजना राबविल्या जातात.

वरील प्रमाणे शासन पुरस्कृत योजना अंमलबजावणीतून ग्रामीण भागात व्यापक प्रमाणात रोजगार संधी निर्मिण होत आहे. महाराष्ट्र राज्य् खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फम राबविल्याजाणा-या योजना या 20 हजाराच्या आत लोकसंख्या आहे. अश्या ग्रामीण भागातच राबविल्या जातात. योजना अंमलबजावणी मागील हेतू ग्रामीण भागात बेरोजगारांचे वाढत चाललेले प्रमाण रोजगारांसाठी शहारांकडे येणारे लोंढे थांबविण्याचे दृष्टीने तसेच ग्रामीण विकासाचे दृष्टीने ग्रामीण

भागातच व्यापक प्रमाणात संधी निर्माण करण्याचे दृष्टीने शासन पुरस्कृत योजना अंमलबजावणी करून अश्या गरीब कारागीरांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न् केल्या जातो. ग्रामीण भागात वरील प्रमाणे योजना अंमलबजावणीतून स्वयं रोजगार निर्मिती केली जाते. तथापी ग्रामीणभागातील उद्योगजाकांना पुढील प्रमाणे उद्योग उभारणीमध्ये अडीअडचणी अनुभवास येत आहेत.

**-:- ग्रामीण उद्योजकांना भेडसावणा-या अडीअडचणी -:-**

1. ग्रामीण भागात विद्युत भारणीयमामुळे उत्पादन प्रक्रियेत येणारी अडचण.
2. पाणि पुरवठयाच्या अडीअडचणी
3. वहातुक सुविधांची अडचण.
4. रस्ते सुविधांचा अभाव.

वरील अडीअडचणीमुळे, ग्रामीण उद्योजकांना त्यांचे उद्योगाचे विकासावर होणारा विपरित परिणाम विचारात घेवून या अडीअडचणी सोडवणुकीच्या दृष्टीने ग्रामोद्योग वसाहत ही योजना महाराष्ट्र राज्य् शासनाचे उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे कडील 12 ते 1993 चे शासन निर्णयानूसार महाराष्ट्र राज्य् खादी व ग्रामोद्योग मंडळाचे नांवे जागा असल्यास अश्या जागेवर नमुद केलेल्या मुलभुत सुविधा निर्माण करून औद्योगीकरणास चालणा देणे हा ग्रामोद्योग वसाहत संकल्पनेमागील हेतू आहे.

1. यवतमाळ जिल्हयात मौजे देवगीरी एम.आय.डी.सी दारव्हा ता. दारव्हा येथील भुखंड क्र. के - 1 ते के - 30 असे एकुण 30 प्लॉट दारव्हा ग्रामोद्योग वसाहतमध्ये असून त्यापैकी 1 ते 29 प्लॉट लाभार्थांना वितरीत करण्यात आले आहे. त्यापैकी 3 लाभार्थांचे उद्योग सुरू झाले आहेत. उर्वरीत 26 प्लॉटवर व्यवसाय सुरू व्हावयाचा आहे. मंडळाच्या नांवे के - 30 क्षेत्रफळ 766 चौ. मीटर चा प्लॉट असून त्यामध्ये कॉमन फॉसिलीटी सेंटर उभारावयाचे असून त्या संबंधी बांधकामासंदर्भात प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. या ग्रामोद्योग वसाहतीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कारागीर, होतकरू तरूणांना या ठिकाणी उद्योग उभारणीसाठी जागा मिळवून देवून त्यास उद्योग उभारणीस शासन पुरस्कृत योजनांचा माध्यमातून मदत करण्याचे धोरण अंगीकारले जाणार आहे.
2. तसेच मौजा वसंतनगर ता. दिग्रस जिल्हा यवतमाळ येथे मंडळाचे नांवे असलेले भुखंड क्र. 13/1/ब/1 हेक्टर 26 आर जागा असून यामध्ये छोटेछोटे प्लॉट तयार करून उद्योजकांना येणा-या काळात देण्याचे नियोजन आहे.

## समुह विकास योजना ( Cluster )

**1) योजनेचे नांव- महाराष्ट्र राज्य औदयोगिक समुह विकास योजना(एमएसआयसीडीपी)**

योजनेचा उददेश - महाराष्ट्र राज्याची औदयोगिक समुह विकास योजना या योजनेचा मुख्य उददेश राज्यातील सुक्ष्म व लघु उपक्रमांची उत्पादकता व स्पर्धाक्षमता उंचावण्यासाठी तसेच त्यांच्या क्षमता वृध्दी करीता सामायीक सुविधा निर्माण करण्यासाठी कार्यमक्रमाची अंमलबजावणी करणे हा आहे.योजनेअंतर्गत खालील प्रमाणे नमुद दोन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येईल.

अ) क्षमता वृध्दी कार्यक्रम - औदयोगिक समुहातील उदयोजक सदस्यामध्ये परस्पर विश्वास व सहकार्य भावना निर्माण करणे ,या साठी विविध प्रकारची क्षमता वृध्दी वाढविणारे कार्यक्रम उदा.अदयावत तंत्रज्ञानाची ओळख,बाजारपेठ विस्तारीकरण, विविध यशस्वी औदयोगिक समुहांना भेटी, प्रदर्शनास सहभाग व अभ्यास दौरे आयोजित करण्यात येतील.

ब) सामायीक सुविधा केंद्र उभारणी - या कार्यक्रमाअंतर्गत सामायिक सुविधा केंद्राच्या स्वरुपात प्रत्यक्ष भौतीक सुविधा निर्माण करण्यात येतील सामायीक सुविधा केंद्रांतर्गत उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येतील. सामायीक प्रकिया केंद्र (उत्पादन प्रकीयेतील) सुधारणा /दुरस्ती/समतोलता निर्माण करणे मुल्यवर्धीत उत्पादने तयार करण्यासाठी सहाय्यभुत ठरतील अशी यंत्र सामुग्री ज्यांची उपलब्धता उदयोग घटक स्वताच्या खर्चाने करु शकत नाहीत. याच बरोबर सामायिक डिझाईन सेंटर चाचणी केंद्र , प्रशिक्षण केंद्र , पॅकेजींग केंद्र, संशोधन व विकास केंद्र, सीईटीपी केंद्र, मार्केटीग डिस्प्ले/विक्री केंद्र ,सामायीक लॉजिस्टीक केंद्र,सामायीक कच्चा माल,बॅक,विक्री डेपो आदीचा समावेश असेल.

क) सामायीक सुविधा केंद्र स्थापनेकरीता महाराष्ट्र शासनाची अनुदान मर्यादा जास्तीत जास्त 5.00 कोटी किंवा एकुण प्रकल्प किमंतीच्या 70 टक्के या पैकी जी कमी असेल ती रक्कम असेल

ड) औदयोगिक समुहात 100 टक्के सुक्ष्म उदयोग घटक किंवा 50 टक्के पेक्षा जास्त महीला उदयोजक असणा-या औदयोगिक समुहाच्या सामायीक सुविधा केंद्र प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची 80 टक्के अनुदान मर्यादा असेल.

**2) योजनेचा कालावधी** - औदयोगिक समुह विकास कार्यक्रमांतर्गत हाथी घेण्यात आलेले प्रकल्प निदानपयोगी अभ्यास अहवालाचे मंजुरी पासुन 3.5 वर्ष कालावधीत पुर्ण करण्यात येतील.विविक्षीत प्रकरणात कालावधी वाढवायची गरज पडल्यास त्यास प्रकल्प मंजुरी समीतीची पुर्ण मान्यता घ्यावी लागेल.

**3) पात्रता** - महाराष्ट्र राज्य औदयोगिक समुह विकास कार्यक्रम (एमएसआयसीडीपी) अंतर्गत खालील प्रमाणे पात्रता धारण करणा-या औदयोगिक समुहांना पात्र ठरविले जाईल.

अ) ''ड'', ''ड±'' आणि ''विनाउदयोग जिल्हे'' (सामुहीक प्रोत्साहन योजना-2013 मध्ये दिल्यानुसार ), तसेच नक्षलग्रस्त क्षेत्र या भागात असणारे औद्योगिक समुह.

ब) सभासदांची संख्या - सामायीक सुविधा केंद्राची स्थापना व त्यांचे कार्य सुलभतेने होण्यासाठी विशेष हेतु वाहन संस्थेची (SPV) स्थापना करण्यात येईल. त्यात सहभागी सुक्ष्म आणि लघु उदयोजकांची सदस्य संख्या कमीत कमी 10 असावी. सदर विशेष हेतु वाहन संस्थेतील कोणत्याही सभासदांचे भाग भांडवल हे 10 टकके पेक्षा अधिक असणार नाही.

क) केवळ नविन सामायीक सुविधा केंद्राना सदर योजनेअंतर्गत मंजुरी देण्यात येईल. राज्यशासन किंवा केंद्र शासनाकडे इतर कोणत्याही योजनेअंतर्गत यापुर्वी मंजुर केलेल्या सामायीक सुविधा केंद्राना सदर योजनेचा लाभ देण्यात येणार नाही. त्याच प्रमाणे सदर योजने अंतर्गत् सामायीक सुविधा केंद्राच्या स्थापनेकरीता औदयोगिक समुहांना एकदाच लाभ देण्यात येईल.

अधिक माहितीकरीता या कार्यालयाशी संपर्क साधावा.

# नागरीकांची सनद

## महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मुख्य कार्यालय मुंबई.

### -: मंडळाची स्थापना :-

महाराष्ट्र राज्यात खादी व ग्रमोद्योगांना प्रोत्साहन देवुन त्यांचे संघटन विकास व विनियमन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम १९६० (सन १९६० चा मूंबई अधिनियम क्र.१९ नुसार ) करण्यात आली आहे. हे मंडळ संपुर्ण स्वायत्त मंडळ आहे.

### -: उद्येश :-

१) खादी व ग्रामोद्योग सुरु करणे, त्यांना प्रोत्साहण देणे , मदत करणे व ते चालु ठेवणे आणि अशा उद्योगांची संबंधीत असलेला व्यापार किंवा धंदा चालविणे व अशा व्यापाराशी किंवा धंद्याशी अनुशंगीक असलेल्या बाबतीत व्यापार किंवा धंदा चालविणे.

२) लोकांना त्यांच्या घरी काम पुरवुन मदत करणे आणि विहित करण्यात येतील त्या अटीवर व्यक्तींना किंवा संस्थांनां किंवा परिसंस्थांना कर्ज व अन्य स्वरुपाचे आर्थिक सहाय्य देणे.

३) खादी व ग्रामोद्योगांसाठी सहकारी संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहण देणे.

४) प्रशिक्षण केद्र चालविणे व अशा केंद्रात खादी व ग्रामोद्योग सुरु करण्यासाठी किंवा चालविण्यासाठी लोकांना आवश्यक असणारे ज्ञान प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षण देणे.

५) (अ) खादी व ग्रामोद्योग चालविण्यासाठी आवश्यक असणारी हत्यारे किंवा औजारे तयार करणे, आणि अशा उद्योगांच्या वस्तु तयार करणे.

(ब) उक्त प्रयोजनासाठी आवश्यक असेल अशा कच्चा माल आणि अशी हत्यारे व औजारे पुर्वीण्याची व्यवस्था करणे, आणि उक्त उद्योगात तयार झालेल्या मालाची विक्री करणे आणि त्याच्या विक्रीची व्यवस्था करणे.

६) भांडारे, दुकाणे, विक्रयालय उघडुन किंवा प्रदर्शने भरवुन खादी व ग्रामोद्योगा पासुन तयार झालेल्या वस्तुंच्या प्रसिध्दीची व त्या वस्तु लोकप्रिय करण्याची व्यवस्था करणे व त्या प्रयोजनाकरीता तत्सम उपाय योजने.

७) खादी व ग्रामोद्योगापासुन तयार झालेल्या वस्तुचा उपयोग करण्या बाबत लोकमत तयार करणे आणि अशा वस्तुंना आश्रय दिल्याने होणारे फायदे जनतेस पटवुन देणे.

८) खादी व ग्रामोद्योग या विषयातील तज्ञांचा सल्ला आणि मार्गदर्शन घेणे व मिळविणे.

९) खादी व गामोद्योगासंबधातील संशोधन कार्य हाती घेणे आणि त्यास उत्तेजन देणे तसेच या अधिनियमाच्या उद्येश्यांत आनुषंगिक व सहाय्यक असतील अशी कामे चालविणे.

१०) या अधिनियमाचे उद्येश पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी राज्य शासन निर्देश देईल अशी इतर कर्तव्ये पार पाडणे व अशी इतर कामे करणे.

## -: मंडळाची रचना :-

मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम १९६० च्या (सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९) कलम ४ (१) व (२) मधील तरतुदीनुसार शासनाकडुन मंडळावर अध्यक्ष व सदस्याची नियुक्ती करण्यात येते, महाराष्ट्र शासनाने ज्या व्यक्ती खादी ग्रामोद्योगाशी निगडीत आहेत व ज्यांना खादी ग्रामोद्योगांच्या कामांचा अनुभव आहे अशा अशासकीय किमान ५ व कमाल ७ सदस्यांची नियुक्ती मंडळावर करण्यांत येते. मंडळाचे सदस्य सचिव म्हणुन मुख्य कार्यकारी अधिकारी हे काम पहातात. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती शासनाकडुन केली जाते.

कलम ४ अन्वये सदस्यांचा कालावधी त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती, सेवेतील भत्ते विहित करण्यात येतील त्या प्रमाणे असतील

## -:जिल्हा समिती :-

ग्रामीण क्षेत्रामध्ये अधिक परिणामकारक प्रभाव पाडण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हा समितीची स्थापना केली जाते त्या मध्ये राज्यशासनाच्या मान्यतेने मंडळाने नेमावयाच्या एका अशासकीय व्यक्तीची सभापती म्हणुन नियुक्ती करण्यात येते जिल्हा परीषेदेच्या समाज कल्याण विभागाचे सभापती, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष , जिल्हा लीड बँकेचे प्रतीनिधी असे ३ सदस्य या व्यतीरीक्त ३ अशासकीय व्यक्ती या पैकी एकतरी व्यक्ती अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती या पैकी असेल आणि त्यांच्या पैकी एकतरी व्यक्ती स्त्री सदस्य असेल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा समाजकल्यान अधिकारी असे ३ सदस्य व मंडळाचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी हे सदस्य सचिव म्हणुन काम पहातात.

कलम ७ अन्वये जिल्हा समितीची रचना व अधिकार व कार्य ठरविण्यात आलेली आहे.

## -: परीषद :-

मंडळाच्या कामात मदत करण्यासाठी राज्य शासणाकडुन राज्य स्तरावर मंडळ परीषेदेची स्थापना केली जाते. या परीषेदेमध्ये मंडळाचे अध्यक्ष व सदस्य, जिल्हा समितीचे अध्यक्ष, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या कमाल ४ व्यक्तीचा समावेश आहे. परीषदेची बैठक किमान त्रैमासीक व्हायला पाहीजे अशी तरतुद आहे.

कलम ६ - ब अन्वये परीषदेची रचना करण्यात आलेली आहे.

# महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ जिल्हा कार्यालय यवतमाळ

## नागरिकांची सनद

## संदर्भ : - मुख्य कार्यालयाचे परिपत्राक कार्यासन -३/टे-५/०४८०३ दिनांक -१६/०५/२०१२

| अ. क्र. | विभागाकडून / कार्यालयाकडून पूरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पूरविली जाईल | सेवा पूरविणारा अधिकारी / कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पूरविली न गेल्यास ज्याच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम :-<br>पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाअंतर्गत स्वंयरोजगार उभारणीचे दृष्टीने सूशिक्षित व प्रशिक्षित बेकार यूवकांना स्थानिक राष्ट्रीकृत बँकेच्या माध्यमातून वित्त सहाय्य मिळवून देण्याचा प्रयत्न करणे -<br>१. उत्पादन क्षेत्राशी निगडीत उद्योग उभारणीसाठी रू. २५ लक्ष कमालतम मर्यादा.<br>२. सेवा उद्योगासाठी रू. १० लक्ष कमालतम मर्यादा<br>३. उत्पादन क्षेत्राशी निगडीत उद्योग उभारणीसाठी रू. २५ लक्ष कमालतम मर्यादा. | खादी ग्रामोद्योग आयोगाकडील पत्र क्र./ पी.एम.ई.जी.पी. / पॉलीसी/जन/२०१०-११ दि. २७/०५/२०११ मधील मार्गदर्शक सूचना प्रमाणे पूढील प्रमाणे विहित कार्यपध्दतीचा अवलंब केला जातो.<br>१. अर्जदार उमेदवाराकडून परिपूर्ण स्वरूपात कर्ज मागणी प्रस्ताव दाखल केला असल्यास प्रस्ताव स्विकृतीचे तारखेपासून १५ दिवसाचे आत हा प्रस्ताव जिल्हा कार्यबल समिती पूढे ठेवण्यात यावा.<br>२. मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठभ्त समितीकडून उमेदवाराची मूलाखत घेतली जाते.<br>३. या मूलाखतीनंतर गठीत समितीकडून उमेदवारांचे प्रस्ताव मंजूरी दिली गेल्यास ज्या मंजूरीचे अधिन राहून मंजूरी प्राप्त प्रस्ताव संबंधित बँक शाखेकडे १५ दिवसांचे मर्यादेत शिफारस करून पाठविण्यात येतात.<br>४. जिल्हा कार्यबल समितीने प्रस्ताव नामंजूर केल्यास त्या प्रकरणी नामंजूरीचे कारण नमूद करून संबंधितास तसे कळविण्यात येते.<br>५. बँक स्तरावरून प्रस्ताव नामंजूर केला गेल्यास नामंजूरीचे बँकेने नमूद केलेले कारण उमेदवारास कळविण्यात येते.<br>६. खादी ग्रामोद्योग आयोगाचे मार्गदर्शक सूचनेप्रमाणे जिल्हयासाठी निर्धारीत केलेल्या लंक्षांकचे १:३ प्रमाणात कर्ज मागणी प्रस्ताव स्विकारले जातात यानूसार पूरेशी प्रस्ताव प्राप्त झाल्यास | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी | १) मा. जिल्हाधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय (अध्यक्ष जिल्हा स्तरीय गठहत समिती चे भूमिकेतून )<br>फोन क्र. ०७२३२ इ २४२५०१<br>२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मूख्य कार्यालय मूंबई ( प्रशासकिय प्रमूख म्हणून )<br>फोन क्र. ०२२- २२६१७६४१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | उमेदवाराकडून परत कर्ज मागणी प्रस्ताव घेवू नये अशा आशयाचे धोरण निर्धारीत केलेले आहे त्यांचे अनूपालन केले जाते.<br>७. बँक स्तरावरून कर्जमागणी प्रस्ताव मंजूर झाल्यावर इ.डी.पी. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर बँक शाखेचे मंजूर कर्जाचा एक हप्ता वाटप केल्यावर फायनांसिंग बँक शाखेकडून मार्जिन मनी दावा मागणी ( २५ ते ३५ टक्के अनूदानाचा भाग ) केली जाते.<br>८. नोडल बँक शाखेकडून मार्जिन मनी प्राप्त झाल्यावर फायनांसिंग बँक शाखेकडून मार्जिन मनीची रक्कम तीन वर्षाचे मूदत ठेवीने ( उद्योजकांचे नावे ) गुंतवणूक करते. या रकमेवर उद्योजकास व्याज दिले जाणार नाही तदवतच मार्जिन मनी ऐवढया भागावर बँकेकडूनही उद्योजकास व्याज आकारले जाणार नाही.<br>९. मंजूर मार्जिन मनीचे अनूदान रूपांतरण ३ वर्षाचे मूदतीनंतर कार्यान्वीत यंत्राणेचे पूर्व परवानगीने करण्यात येईल. अनूदान रूपांतरणाचे कार्यवाहीसाठी पुढील १ ते ४ निकष निर्धारीत केलेले आहेत :-<br>अ) कर्जाचा योग्य विनियोग केल्याची खात्री.<br>ब) प्रकल्प अहवालात नमूद केलेनूसार रोजगाराची उपलब्धता<br>क) ग्रामोद्योगाचे व्याखेचा भंग होवू न देता व्यवसाय / उद्योग चालू ठेवणे.<br>ड) बँक कर्जाची नियमित परत फेङ | | |
| | | लागणारी आवश्यक कागदपत्रं :-<br>१) विहित नमूण्यातील अर्ज दोन प्रतीमध्ये<br>२) मंडळाच्या अटी व शर्ती बाबतचे शपतपत्र रू. १००/-<br>३) शळा सोडल्याचा दाखला , गूणपत्रीका<br>४) रेशन कार्ड , मतदान कार्ड , आधार कार्ड<br>५) नियोजित जागेबाबतचे पूरावे<br>६) निवडलेल्या उद्योगाचे अनूभव किंवा प्रमाणपत्र<br>७) कर्ज मागणी प्रस्ताव रू. १ लक्षापेक्षा वरील असल्यास तसे प्रक्ल्प अहवाल.<br>८) संबंधित बँक शाखेची खातेपूस्तिका<br>९) विद्यूत पूरवठा आवश्यक असल्या तसे संबधित विभागाचे अनूमती प्रमाणपत्र | | |
| २ | विशेष घटक योजना :-<br>शासनासचे २० कलमी कार्यक्रमा अंतर्गत कलम ११ अ अन्वये अनुसूचित जाती व | अनुसूचित जाती व नवबौध्द समाज घटकातील उमेदवाराकडून परिपूर्ण स्वरूपात प्रस्ताव सादर केल्यावर<br>१. निर्धारित लंक्षांक ( बँक शाखेचा लक्षांक ) यानूसार १:२ या | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नवबौध्द समाजातील उमेदवारांना उद्योग उभारणीसाठी रू. ५० हजाराचे मर्यादेत आर्थिक सहाय्य स्थानिक राष्ट्रीयकृत बँकाचे माध्यमातून मिळवून देणे.<br>निकष :- १) ग्रामिण भागातील उमेदवारासाठी वार्षिक उत्पादन मर्यादा रू. ४०५००/- तर शहरी भागातील उमेदवारासाठी वार्षिक उत्पादन मर्यादा रू. ५१५००/- अशी आहे.<br>२) सक्षम प्राधिकारी यांचेकडून उमेदवाराचे नावाचे जातीचे प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत<br>३) शासन पूरस्कृत योजनेच्या माध्यमातून अनूदानाचा फायदा घेतला नसलेचे इतर महामंडळाकडील प्रमाणपत्र तसेच कर्ज प्रकरणासाठी निर्धारीत केलेले इतर कागदपत्र | प्रमाणात प्रस्ताव स्विकारल्यानंतर ८ ते १० दिवसाचे मूदतीत प्रकरणे संबंधितांचा प्रस्ताव बँकेकडे शिफारस करून पाठविला जाईल.<br>२. संबंधित अर्थ सहय्य देणाऱ्या बँक शाखेकडून कर्ज मंजूर करून १०० टक्के कर्जाचे वितरण केल्यावर व बँकेकडून परिशिष्ठ क्र.-३ चे विहित नमुण्यात याबाबत ि ाहिती पाठविल्यावर तसेच उद्योजक उमेदवाराने अनूदान मागणीसाठी प्रस्तावासंबंधि विहित कागदपत्रा पूर्ण करून दिल्यावरअनूदान मागणीसाठी लागणारी रक्कम मंडळाचे मुख्य कचेरीकडे मागणी केली जाईल.<br>३. सदरहू मागणी नूसार शासनाकडून मंडळाचे मूख्य कचेरीस निधी उपलबध करून दिल्यानंतर मंडळाचे मुख्य कचेरीकडून जिल्हा कचेरीस अनुदान निधी मंजूर करून पाठविण्यात येतो.<br>४. उद्योजकास बँकेने मंजूर केलेल्या कर्जावर विशेष केंद्रिय सहाय्यातून रक्कम रू. १००००/- पर्यंत अथवा मंजूर कर्जाच्या ५० टक्के पैकी कमी असलेली रक्कम लाभधारकास अनुदान स्वरूपात मंजूर करून संबंधित बँक शाखेस ही रक्कम मुदल कर्जापोटी जमा घेणेसाठी पाठविण्यात येते.<br>५. हि कार्यवाही १५ दिवसात केली जाते. | | मुख्य कार्यालय मूंबई ( प्रशासकिय प्रमूख म्हणून )<br>फोन क्र. ०२२- २२६१७६४१ |
| ३ | एकात्मीक मधमाशापालन प्रजनन व मध उत्पादन योजना - एकात्मीक मधमाशापालन प्रजनन व मध उत्पादन योजने अंतर्गत शेतक-यांना त्यांचे शेती उत्पादनात ३०ते ४० टक्के ऐवढया प्रमाणात वाढ मिळवुन देण्याचे दृष्टीने.<br>१. शेतक-यांना मधपाळ म्हणुन १० दिवसाचे प्रशिक्षण देणे.<br>२. प्रशिक्षित मधपाळ यांना मधमाशापालन उद्योग सुरु करणेसाठी बँकेकडे त्यांचे कर्ज माणी प्रस्ताव शिफारस करुन पाठविणे.<br>३. तांत्रिक कर्मचा-याकडुन मधमाशापालन उद्योग सुरु केलेल्या मधपाळास व्यवसायाचे अडी अडचनी सोडविण्याचे दृष्टीने मार्गदर्शन करणे.<br>४. मंडळाचे निर्धारीत केलेल्या हमी भावात (प्रचलीत दर रु.१६०/- प्रती किलो मधासाठी )मध घेवुन तो मध संचालनालय यांना | **मधमाशा पालन हा उद्योग शेतीपूरक उद्योग आहे. मधमाशापालन उद्योग शेतक-यांने त्यांचे शेतावर सुरु केल्यास फुलवर्गीय असलेली पिके यात फळझाडे, फळभाज्या, भाज्यांची बियाने, डाळी वर्गीय पिके, तेल बिया पिके तृणधन्य, फुलझाडे व शेतीतील इतर पिके, आणि जंगली वनस्पती ही सर्व पिके मधमाशा पालनासाठी उपयुक्त पिके आहेत. शेतक-यांने त्यांचे शेतावर मधमाशा पालन उद्योग सुरू केल्यास परागीभवनाव्दारे शेतीपिके, फळबागायती, पिकाच्या उत्पादनात भरीव वाढ होणेस सहायभुत होते. शिवाय मधाचेसाठी रू. १६०/- किलो हमी भाव मध मंडळामार्फत खरेदी केले जातात.**<br>**मधमाशा पालन हा उद्योग शेती उद्योगाशी पुरक उद्योग असल्यामुळे व शेती उत्पादनात हा उद्योग केल्यास शेतीत भरीव स्वरूपात उत्पादनात वाढ होते.** | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मूख्य कार्यालय मूंबई ( प्रशासकिय प्रमूख म्हणून )<br>फोन क्र. ०२२- २२६१७६४१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पाठविणे. | | | |
| ४ | पणन कार्यक्रम -<br>शासन निर्णयातील तरतुदीसाठी मंडळासाठी आरक्षित केलेल्या ग्रामोद्योगी उत्पादीत वस्तुंची खरेदी बाबत सेवा-<br>आरक्षित उद्योग सुचितील उद्योजकांना (मंडळाकडे युनिट नोंदणी केलेले ) उत्पादीत मालास शासकिय बाजारपेठ मिळवुन देणे शासनाचे भांडार खरेदी विभगाकडुन प्रतिवर्षी दरनिश्चिती करुन दिली जाते व त्यानुसार उत्पादनांची खरेदी केली जाते तसेच जिल्हयातील शासकिय कार्यालयांना या नियंत्रीत दरात खरेदीकरणेचे दृष्टीने प्राधान्यक्रम प्राधान्यक्रम देणेबाबत धोरण आहे.<br>ग्रामोद्योगी वस्तु उत्पादने :-<br>१. फाईल कव्हर, फाईल बोर्ड, केसबोर्ड, २. साबण, फिनेल ३. बॅरेक, ब्लँकेट . ४. गादी,उशी, व उशी कव्हर. ५. घोंगडया, कांबळी, ६. सागवाणी फर्निचर. ७.डस्टर. ८. दोरखंड. ९. मेणबत्ती | १. मंडळाकडुन लाभान्वीत उद्योजकांनी युनिट नोंदणीचा प्रस्ताव परीपुर्ण कागदपत्रांनीशी दाखल केल्यावर जिल्हा कचेरीचे शिफारसीसह प्रस्ताव १५ दिवसांचे आत पाठविणे.<br>२. युनिट नोंदणी केलेल्या उद्योजकांकडुन त्यांचे उत्पादनांची उत्पादन क्षमता (वार्षिक) ची माहिती मंडळांचे मुख्य कचेरीस पाठविण्यात येते.<br>३. जिल्हा स्तरावर अशा उत्पादन्नांचे संदर्भात मार्केटींग मिळुन देणेचे दृष्टीने प्रयत्न केले जातात.<br>४. मध्यवर्ती ग्राहक भांडार खरेदी कडुन ऑर्डर दिलेल्या उद्योजकाच्या उत्पादनाचे नमुने तपासुन मध्यवर्ती ग्राहक भांडार खरेदी विभागास पुरवठयाचे कामी शिफारस करुन पाठविणेबाबत कार्यवाही केली जाते. | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मूख्य कार्यालय मूंबई ( प्रशासकिय प्रमूख म्हणून )<br>फोन क्र. ०२२- २२६१७६४१ |

**जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी**
**यवतमाळ**